आर.सी.सी. क्र. ३२४/२०२४

नि.क्र. १६

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – संदीप लहु गुंजाळ

वय – ३७ वर्षे, व्यवसाय – गाडी फिटर

राहणार– टाकळी ढोकेश्वर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत**–

सन २०१३ पासून माझे साई मोटर्स नावाने दुचाकी व चार चाकी वाहनाचे दुरुस्ती व त्याचे तपासणीचे काम पाहणारे दुकान आहे. दिनांक ०१/१०/२०२३ रोजी बजाज कंपनीची प्लेटीना वहान तपासणीसाठी माझ्याकडे पोलीस गायकवाड आले होते. गाडीचा नं. एम.एच. १७–८३६१ असा होता. त्या बाबत माझ्या दुकानाच्या नावे पोलीसांनी पत्र दिले होते. मी प्लॅटीना गाडी तपासली. पत्र दिल्यानंतर मी लगेच गाडी तपासली. त्या वाहनाचे हॅन्डल वाकले होते व समोरची लाईट फुटले होते. ती गाडी चालविण्याच्या स्थितीत नव्हती. मी तपासणी बाबात दिलेले पत्र मला दाखवण्यात आले त्यावर माझी सही व दुकानाचा शिक्का असून त्यातील मजकुर खरा आहे. त्यास **निशाणी १७** देण्यात येते. ज्या गाडीची मी तपासणी केली तीचे दोन फोटो मला दाखवण्यात आले. ही तीच गाडी असून सदर फोटोला ओळखीसाठी आर्टीकल अ व ब देण्यात येते.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एम.एस. औटी यांनी नाकारला.**

मी साई मोटार्स दुकान मी स्वताः सन २०१३ पासून पहात आहे. मी दहावी पास आहे. मॅकेनिकल संदर्भात व गाडीचा अपघात झालयावर त्याची तपासणी करण्यासंदर्भात मी कोणताही कोर्स केलेला नाही. माझ्या दुकानासंदर्भात मी आर.टी.ओ. कडून पत्र घेतलेले नाही. तपासलेल्या गाडीचा मालक मला माहित नाही. गाडीचे कागदपत्र मी पाहिले होते. जे मी प्रमाणपत्र दिले त्याचे रेकॉर्ड

माझ्याकडे असते आज ते मी माझ्या सोबत आणले आहे.  पोलीसांनी गाडी तपासून झालयानंतर मला पत्र दिले होते.  हे म्हणे खरे आहे की, पोलीस नेहमी अपघात झाला की माझ्याकडून अशा प्रमाणपत्राची मागणी करतात.  हे म्हणे खरे नाही की, पोलीस मला जसे सांगतील तसे प्रमाणपत्र मी तयार करुन देत असतो.  हे म्हणे खरे आहे की, गाडीवरुन पडल्याने गाडीचे ब्रेक फेल, तसेच हॅन्डेल वाकू शकते व लाईट फुटू शकते.  हे म्हणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी मी वहानाची पहाणी केली नाही.   हे म्हणे खरे आहे की, घटना स्थळी वहानाची पहानी केली नाही.  हे म्हणे खरे नाही की, असा अपघातामुळे गाडीचे लाईट फुटले नाही व स्पेअरपार्ट खराब झाले नाही.  हे म्हणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २०/०७/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.